जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स


# 'नवी बांधकामे पर्यावरणपूरकच हवीत'

कोल्हापूर टाइम्स टीम

'वाढत्या लोकसंख्येचा आवाका लक्षात घेता बहुमजली इमारतींची उभारणी अपरिहार्य आहे. त्याचबरोबर वाढते प्रदूषण, नैसर्गिक वाळूची कमतरता या सामाजिक जाणिवांचे भान ठेवून पर्यावरणपूरक बांधकाम करणे अत्यावश्यक आहे' असे मत अल्ट्रा-टेक सिमेंटचे विभागीय प्रमुख इंजिनिअर हेमंत जैन यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आयोजित 'कॉँक्रिटचे प्रकटीकरण' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

इंजिनीअर जैन म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी फक्त परीक्षार्थी न होता, ज्ञानार्थी झाले पाहिजे, तरच रोजगाराभिमुख अभियंते निर्माण होतील. देशभरात स्मार्ट सिटी विकसित करण्याचा प्रयत्न चालू आहे. यामध्ये प्रामुख्याने पायाभूत सुविधांचा विकास अपेक्षित आहे. यामुळे सध्या महामार्ग, उड्डाणपूल यांचे बांधकाम वेग घेणार हे नक्कीच. या दृष्टीने सध्या वापरात असलेले सिमेंटचे प्रकार व कॉंक्रीटचे प्रकार अपुरे आहेत. त्यासाठी मजबूत कॉंक्रीट, पर्यावरण पूरक ग्रीन कॉंक्रीट यासारखे विविध पर्यायांचा विचार, संशोधन आणि प्रत्यक्ष वापर गरजेचा आहे.'

कार्यक्रमास तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. जयदीप बागी यांनी अधिविभागातील सुरू असलेल्या विविध प्रकल्पाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास इंजिनीअर महेश शिंदे, स्थापत्य अभियांत्रिकीचे समन्वयक प्रा. महेश साळुंखे आदी उपस्थित होते.



20 FEB 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकसत्ता

विद्यापीठ विश्व

योगेश बोराटे
borateys@gmail.com



# मुक्त शिक्षणाचे प्रवेशद्वार

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**संस्थेची ओळख**

दूरशिक्षणाच्या क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणून नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा गौरवोल्लेख केला जातो. १ जुलै, १९८९ रोजी या विद्यापीठाची स्थापना झाली. नाशिक येथील 'ज्ञानगंगोत्री' या मुख्य शैक्षणिक संकुलामधून या विद्यापीठाचे प्रशासकीय कार्य चालते. हे विद्यापीठ दूरशिक्षणाच्या माध्यमातून नेहमीच्या अभ्यासक्रमांसोबतच इतर विद्यापीठांमध्ये उपलब्ध नसलेले अनेक अभ्यासक्रमही विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत आहे. शास्त्रशुद्ध संप्रेषण आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून दूरशिक्षणाच्या विविध योजना राबविण्यामध्ये हे विद्यापीठ अग्रेसर मानले जाते. रोजगाराभिमुख शिक्षण, अभ्यासक्रमांसाठी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर, सुलभ प्रवेशप्रक्रिया, अभ्यासक्रम निवडीचे स्वातंत्र्य, राज्यभरात उपलब्ध असलेली अभ्यासकेंद्रे ही या विद्यापीठाची महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरतात. कवी कुसुमाग्रजांनी लिहिलेले 'एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना' हे विद्यापीठ गीत या संस्थेच्या स्थापनेमागची उद्दिष्ट्ये आणि संस्थेच्या कार्याची प्रेरणा सातत्याने अधोरेखित करत आहे. राज्यातील इतर पारंपरिक विद्यापीठे काही जिल्ह्यांपुरती मर्यादित असतानाच, मुक्त विद्यापीठ मात्र राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील दिसते.

विद्यापीठाचे मुख्य कार्यालय हे नाशिक येथे असले, तरी आपल्या विभागीय केंद्रांच्या माध्यमातून हे विद्यापीठ राज्यातील इतर सर्वच विभागांमध्ये आपल्या सेवा पुरवत आहे. राज्यात नाशिकसह अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, कल्याण, मुंबई, नांदेड, नागपूर, पुणे, सोलापूर येथे विद्यापीठाची विभागीय केंद्रे आहेत. या शिवाय राज्यभरात सर्वत्र असलेल्या अभ्यास केंद्रांच्या जाळ्यामधून हे विद्यापीठ समाजातील अगदी शेवटच्या घटकापर्यंत शैक्षणिक सोयी-सुविधा पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**अभ्यासक्रम** – विद्यापीठाला मिळालेल्या विशेष दर्जामुळे हे विद्यापीठ प्रमाणपत्र, पदविका आणि पदवी स्तरावरील विविध पारंपरिक, तसेच विशेष अभ्यासक्रम दूरशिक्षणाद्वारे राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवू शकते. विद्यापीठाचे शैक्षणिक सेवा, मानव्य विद्या व सामाजिक शास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, कृषी विज्ञान, शिक्षणशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, आरोग्य विज्ञान, वास्तुकला- विज्ञान व तंत्रज्ञान हे विभाग त्यासाठी वेगवेगळे अभ्यासक्रम चालवतात. शैक्षणिक सेवा विभागामध्ये मानवी हक्क प्रमाणपत्र, बी. ए. ग्राहक सेवा, गांधी विचार दर्शन पदविका, शैक्षणिक संप्रेषण तसेच संप्रेषण या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मानव्य विद्या व सामाजिक शास्त्र विभागांतर्गत पत्रकारिता पदविका आणि पदवी, लायब्ररी सायन्सचा पदवी अभ्यासक्रम चालतो. वाणिज्य व व्यवस्थापन विभागामध्ये को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंटची पदविका, हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट पदविका, एमबीए आदी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. कृषी विज्ञान विभागात माळीकाम प्रमाणपत्र अभ्यासक्रम, फळउत्पादन, पालेभाज्या उत्पादन विषयातील पदविका, शेतीवर आधारित उद्योगांच्या व्यवस्थापनाशी निगडित पदविका, कृषी पत्रकारिता विषयातील पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. शिक्षणशास्त्रामध्ये शाळा व्यवस्थापनाची पदविका, मूल्यशिक्षणाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, तर कॉम्प्युटर सायन्स अंतर्गत नानाविध प्रोग्रामिंग लँग्वेजशी निगडित प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रम चालविले जातात. निरंतर शिक्षणांतर्गत विद्यापीठामध्ये विविध कौशल्याधारित पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम, परकीय भाषांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विभागामध्ये वास्तुशास्त्रामधील बी. आर्च हा पदवी अभ्यासक्रम, तसेच ॲक्चुरिअल सायन्स विषयातील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविला जातो. आरोग्य विज्ञान विभागांतर्गत योग शिक्षक पदविका, मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ, इंडस्ट्रिअल ड्रग सायन्स विषयातील पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. दूरशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनाला चालना देणारे हे अभ्यासक्रम गरजू विद्यार्थ्यांची शैक्षणिक भूक भागविण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत.

### सुविधा

विद्यापीठाने दूरशिक्षणाच्या सोयी-सुविधा राज्यभरात पोहोचविण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. त्या आधारे आपल्या अभ्यास केंद्रांमधून आभासी वर्गांचे जाळे उभारले आहे. विद्यापीठाने 'व्हिडीओ ऑन डिमांड'ची सुविधा पुरविण्याचा प्रयोगही यशस्वी करून दाखविला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या गटांसाठी विशिष्ट विषयांवर आधारित व्हिडीओ प्लेअर्स आपल्या संकेतस्थळामार्फत संबंधितांपर्यंत पोहोचविण्याची सुविधा विकसित केली आहे. शिक्षणाचे कार्य केवळ महाविद्यालयीन शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता ते इतर गटांपर्यंतही पोहोचावेत, या उद्देशानेही विद्यापीठाने प्रयत्न केले आहेत. त्यातूनच पुढे आलेला उपक्रम म्हणून विद्यापीठाच्या 'मोबाइल लर्निंग सेंटर'चा विचार केला जातो. मोबाइल व्हॅनच्या मदतीने शहरापासून लांबवरच्या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्युटरचे अभ्यासक्रम आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात या उपक्रमाने मोठा वाटा उचललेला आहे. विद्यापीठाच्या नाशिक येथील संकुलाच्या आवारामध्ये भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या मदतीने कृषी विज्ञान केंद्रही चालविले जाते. विद्यापीठाच्या स्वतःच्या ऑडिओ व्हिज्युअल सेंटरमध्ये अभ्यासक्रमांवर आधारित दृकश्राव्य कार्यक्रमांची निर्मिती केली जाते. त्यासाठी आवश्यक अत्याधुनिक सुविधा विद्यापीठाने उभारल्या आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून सोयी-सुविधा आणि सूचना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्या जातात. दूरशिक्षणामध्ये नवमाध्यमांची उपयुक्तता विचारात घेत विद्यापीठाने फेसबुक पेजच्या माध्यमातूनही आपल्या सोयी-सुविधांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पावले उचलली आहेत.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2018
Times of India

# Certificate course on Modi script at SUK

**Kolhapur:** SUK's Chhatrapati Shahu Maharaj history study centre is offering a two-week long certificate course in the Modi script. The course will start from Tuesday and end on March 3. Over six centuries old, the Modi script was used to write Marathi. Machindra Choudhary from Aurangabad will deliver lectures on the Modi lipi along with the study centre coordinator Nilambari Jagtap. Students with valid identity cards will be charged Rs 500 for the course, while the general public will have to pay Rs 700. The official said those interested can contact the course coordinator Nilambari Jagtap for further details or call 0231-2606119 or 9075073927. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2018
सकाळ

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे प्रतापराव पवार यांना डी. लिट.



प्रतापराव पवार

पुणे, ता. १९ : टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठाने 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांना 'डी. लिट.' ही मानद पदवी जाहीर केली आहे. विद्यापीठाच्या २४ मार्च रोजी होणाऱ्या एकोणिसाव्या पदवीप्रदान समारंभात पवार यांना या पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विद्यापीठ व्यवस्थापकीय मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

उद्योग, प्रसारमाध्यमे आणि सामाजिक क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पवार यांना या पदवीने सन्मानित करण्यात येईल. पवार यांनी उद्योगक्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटविला आहे. अनेक उद्योगसमूहांच्या संचालक मंडळांत त्यांचा समावेश आहे. या क्षेत्रांतील दीर्घ अनुभवामुळे 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चर'चे अध्यक्षपद त्यांनी समर्थपणे भूषविले. पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळात, तसेच विविध सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांच्या विश्वस्त मंडळांत पवार यांचा समावेश आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या

पान ८ वर »

नियामक मंडळावरही (सिनेट) त्यांनी काम केले आहे.

पवार यांना 'पद्मश्री'ने सन्मानित करण्यात आले आहे. प्रेस कौन्सिलचे सदस्य, इंडियन लँग्वेजेस न्यूजपेपर असोसिएशनचे (भारतीय भाषिक वृत्तपत्र संघटना) अध्यक्ष, वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्यूज पेपर्सचे (वॅन) संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. तसेच, विद्यार्थी सहायक समिती, बालकल्याण संस्था, पुणे अंधशाळा अशा विविध सामाजिक संस्थांच्या कामात पवार यांचे योगदान मोठे आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे १९९३ पासून विविध क्षेत्रांतील दिग्गजांना 'डी. लिट.' ही मानद पदवी देण्यात येते.

यापूर्वी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, पंडित भीमसेन जोशी, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. वसंत गोवारीकर, सिंबायोसिस शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार, ज्येष्ठ गायिका किशोरी आमोणकर यांच्यासह अन्य मान्यवरांना या पदवीने सन्मानित केले आहे.

20 FEB 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धेच्या युगात यशासाठी कठोर मेहनतीची गरज

## अभिनेत्री तेजस्विनी पंडित

**जयसिंगपूर / प्रतिनिधी :**
सध्याच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगामध्ये यश मिळविताना कठोर मेहनत व एकाग्रता आवश्यक आहे. तसेच आई-वडील व गुरू यांच्या संस्काराची शिदोरी घेऊन वाटचाल केल्यास स्वप्नपूर्तीचा प्रवास निश्चितपणे सुखकर होईल. आपण स्वप्न पहा; मात्र त्यासाठी संयम ठेवून कार्यरत रहा व देशाच्या समृद्धीसाठी झटत रहा, असा मौलिक सल्ला सिनेतारका तेजस्विनी पंडित यांनी डॉ.जे.जे.मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुख्य वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी बोलताना दिला. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन विजय मगदूम होते.

डॉ.जे.जे.मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा मुख्य पारितोषिक वितरण समारंभ रविवारी विविध उपक्रमांनी साजरा झाला. या समारंभास प्रसिद्ध वक्ते व लेखक अच्युत गोडबोले, रिक्रूमेंट हेड इंडिया टिबको सॉफ्टवेअरचे करण बक्षी, सिनर्जी ग्रिन इंडस्ट्रीज इंडियाचे कार्यकारी संचालक व्ही.श्रीनिवासा रेड्डी, ऑफ पोलीस मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स महाराष्ट्र शासन असिस्टंट कमिशनर योगेश मदने, मगदूम ट्रस्टच्या व्हाईस चेअरमन ॲड.सोनाली मगदूम आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.



**जयसिंगपूर : डॉ.जे.जे.मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयात बोलताना सिनेतारका तेजस्विनी पंडित, व्यासपीठावर विजय मगदूम, ॲड.सोनाली मगदूम, करण बक्षी, योगेश मदने आदी.**

यावेळी बेस्ट आऊटगोईंग स्टुडंटचे पारितोषिक दीपिका राजेश ओसवाल, बेस्ट ॲकॅडमी एक्सलंन्स ॲवॉर्ड रोहित किशोर मुळे यांच्यासह सना बागवान, भाग्यश्री गोडबोले, नेहा दळवी यांचा शिवाजी विद्यापीठात रॅंकिंग मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तर आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धेत यश संपादन केलेले रोहित मोकाशी, अभिजीत वडगांवे, रोहित चौधरी, शिवप्रसाद बांदिगिरे, अनिल देवकाते यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. याशिवाय एस.आर.महाडिक, बी. एन. कुंभार, राजन मगदूम, व्ही. एम. सकट या कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी योगेश मदने, करण बक्षी, व्ही.श्रीनिवासा रेड्डी यांनी मनोगत व्यक्त केले.

स्वागत प्रा.पी. पी. पाटील, तर अहवाल वाचन प्राचार्य डॉ.संजय सावंत यांनी केले. तर जे.जे.मगदूम ट्रस्टचे चेअरमन विजय मगदूम यांनी प्लेसमेंट अध्यापन व महाविद्यालयात असणारी शिस्त या बळावर विविध कंपन्यांबरोबर असणारे करार यापुढे वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाईल, असे त्यांनी सांगितले. या समारंभाचे उत्कृष्ट संयोजन महाविद्यालयाच्या विविध समित्यांनी केले. क्रीडा प्रतिनिधी धारणा जाजल हिने आभार मानले.

20 FEB 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Caste certificates must for filling forms

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Applications to engineering, business management, pharmacy and other professional courses would require presentation of caste certificate at the time of filling up forms, the state directorate of technical education (DTE) has declared.

Earlier, students submitted the caste certificate after they secured admission to colleges.However, many applications were rejected after scrutiny if certificates which disturbed the merrier list process.

Director of DTE SK Mahajan said, "The students need to have the caste certificate ready at the time of filling forms. They should not wait for the list to be declared."

## Admission process to go online next yr

The DTE has decided to conduct the entire admission process for professional courses online from the 2019-20 academic year. Presently, only form submission is conducted online. The candidates have to go to the counselling centres after online submission, get documents scrutinized, and submit the print out of the online form. However, this tends to be a time-consuming process. The DTE is going to conduct the document submission and scrutiny online from next year so as to accelerate the process, Mahajan said.

The professional courses include engineering, pharmacy, hotel management and catering technology, architecture, masters in business administration, masters in computer applications as well as polytechnic courses at graduate and postgraduate level.

It is mandatory for minority candidates to submit the caste certificates in order to receive benefits such as fee concessions, admission on reserved seats, and scholarships, among others.

Mahajan explained, "The social welfare department issues the caste certificate to the candidates every year. The candidates are given three to six months to seek the certificates. Sometimes candidates, who are ineligible, also apply under this category. After scrutiny, the admissions of such ineligible candidates is rejected. In order to eliminate this rejection process, we have decided to ask for certificates in the first step itself."

According to Mahajan, every year the DTE makes an announcement about securing caste certificates to minority students. However, it may take time for the certificates to be issued. Some candidates, taking advantage of the delay, apply under the category despite being ineligible, he said.

Mahajan added, "When the admissions of such candidates is cancelled, they approach the court for a stay on the process. The officials face such a situation almost every year. With the new process, there will be a reduction of such illegal practices."

20 FEB 2018 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बारावीची उद्यापासून परीक्षा

## कोल्हापूर विभागातून १ लाख २९ हजार विद्यार्थी देणार परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (बारावी) बुधवार (दि. २१) पासून सुरू होत आहे. पहिला पेपर सकाळी अकरा ते दोन या वेळेत इंग्रजी विषयाचा आहे. विद्यार्थी आणि पालकांकडून कोणत्या महाविद्यायांत बैठक व्यवस्था आहे याची आज दिवसभर माहिती घेतली जात होती. यंदा कोल्हापूर विभागातून जवळपास एक लाख २९ हजार ९३९ परीक्षार्थी आहेत. कोल्हापूर विभागातील १५४ केंद्रांवर परीक्षा होणार असून यासाठी बोर्डाकडून तयारी पूर्ण झाली असल्याचे सांगण्यात आले. परीक्षा २० मार्चपर्यंत असणार आहे.

**विद्यार्थ्यांसाठी सूचना**

परीक्षार्थींनी पेपरच्या वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रात उपस्थित राहावे. दुपारी असणाऱ्या पेपरबाबतही अर्धा तास अगोदर यावे, असे विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले आहे.

**कॉपीमुक्त अभियानाला सहकार्य करा**

कॉपीमुक्त अभियानासाठी परीक्षा मंडळाने कोल्हापूर विभागाने एकूण एकोणीस भरारी पथके नेमली आहेत. कोल्हापूर जिल्ह्यासाठी सात आणि सांगली व सातारा जिल्ह्यांसाठी प्रत्येकी सहा भरारी पथके परीक्षा काळात कार्यरत असतील.

परीक्षा केंद्रांवर शांततेत प्रवेश करण्याच्या सूचना भरारी पथकांना देण्यात आल्या असून, कॉपीमुक्त अभियानास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### परीक्षा केंद्रांवर मोबाईल बंदी

*परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना मोबाईल बंदी आहे. यासह केंद्रांवरील सर्व पर्यवेक्षकांनाही मोबाईल बंदी घालण्यात आली आहे. त्यांनी आपले मोबाईल केंद्र संचालक यांच्याकडे जमा करायचे आहेत. गरज पडल्यास केंद्र संचालकांना संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.*

### जिल्हानिहाय परीक्षार्थी

| | |
|---|---|
| कोल्हापूर : | 53594 |
| सांगली : | 36835 |
| सातारा : | 39510 |

**बैठक व्यवस्थेबाबत आवाहन**

बारावी परीक्षेची बैठक व्यवस्था बोर्डाकडून जाहीर करण्यात आली आहे. संबंधित महाविद्यालयात याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली जात आहेच. शिवाय, प्रत्येक विषयानुसार केंद्र कार्यरत आहेत. संबंधित केंद्र प्रमुखांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महावीर कॉलेज केंद्र क्र. ४२४ हे वाणिज्य शाखेसाठी मुख्य केंद्र आहे. विद्यार्थ्यांनी केंद्र संचालक संदीप नलवडे यांच्याशी संपर्क साधावा. विवेकानंद कॉलेज केंद्र क्रमांक ०४२३ कला शाखेसाठी असून केंद्रप्रमुख एम. ए. कुरणे यांच्याशी संपर्क साधावा. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज शास्त्र शाखेसाठी आणि एचएससी व्होकेशनल (एमसीव्हीसी) अभ्यासक्रमांसाठी असणार आहे. केंद्रप्रमुख आर. वाय. पाटील यांच्याशी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा.

20 FEB 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



दै. 'पुण्यनगरी'च्या वर्धापनदिनानिमित्त संपादक अशोक घोरपडे यांना शुभेच्छा देताना हिंदकेसरी विनोद चौगले, महानभारत केसरी दादू चौगले, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, महाराष्ट्र केसरी नामदेवराव मोळे, आंतरराष्ट्रीय नेमबाज अनुष्का पाटील, राष्ट्रवादी क्रीडा सेलचे अध्यक्ष सुहास साळोखे, डॉ. प्रवीण कोडोलीकर, अमोल एकळ, एनएसयूआय अध्यक्ष पार्थ मुंडे, महालक्ष्मी वुमेन्स फौंडेशनच्या अध्यक्षा हेमलता माने, शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदीवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अलोक जत्राटकर, अ‍ॅड. सरिता भोसले, शिवसेना करवीर तालुकाप्रमुख राजू यादव.